महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक : एमआयएस-०६१८/सीआर-६१/२०१८/तीन दिनांक : ०४ जानेवारी, २०२१

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय** :- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले आहे. सदर आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीच्या आधारे शासनाच्या संबंधित विभागांच्या मागणीनुसार आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या विविध परीक्षांच्या जाहिरातींमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी पदे आरक्षित दर्शविण्यात आली आहेत. प्रस्तुत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : राआधो-४०१९/प्र.क्र.३१/ १६-अ, दिनांक २३ डिसेंबर, २०२० अन्वये शासनाकडून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय ठरविण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयाद्वारे जारी करण्यात आलेल्या आदेशास अनुसरुन सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील उमेदवारांकडून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून आरक्षणाचा लाभ घेण्याबाबतचा विकल्प घेणे आवश्यक झाले आहे.

२. आयोगामार्फत सन २०२० मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या खालील जाहिरातीस अनुसरून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यापैकी कोणत्या आरक्षणातून लाभ घ्यावयाचा आहे, याविषयी प्रस्तुत दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शासनाकडून विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे :-

(१) सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा - २०२०
(२) राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०२०
(३) महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२०
(४) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा - २०२०

३. आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या उपरोक्त परीक्षांकरीता अर्जाद्वारे फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विकल्प देण्यासंदर्भातील कार्यवाही खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे :-

(१) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे **दिनांक ०५ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवारी, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवाराने अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यापैकी कोणत्या आरक्षणातून लाभ घ्यावयाचा आहे, याबाबतचा विकल्प देणे आवश्यक आहे.

(२) अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी असलेल्या आरक्षणाचा दावा विहित कालावधीत सादर न करणाऱ्या उमेदवारांचा फक्त अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करण्यात येईल.

(३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेतल्यास संबंधित उमेदवार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही.

(४) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणाली द्वारे विहित कालावधीत विकल्प सादर केलेल्या अथवा विकल्प सादर न केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत दाव्यातील बदलाबाबतची विनंती नंतरच्या टप्प्यावर कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

४. प्रस्तुत दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेली उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल विविध याचिकांवरील अंतरिम अथवा अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

सहसचिव, परीक्षापूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग